# दत्तकेच्छुक पालक व अनाथ बालक

आम्ही या दोघांना एकत्र आणण्यास मदत करतो. दत्तक विधानाद्वारे पत्येक बालकाचे पालन, पोषण, संवर्धन जसे कुटूंबात होणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक कुटूंबात एक तरी लडीवाळ बालक खेळता असावा ही दांम्पत्याची नैसर्गिक गरज आहे. ही नैसर्गिक गरज पुर्णत्वाला नेण्यासाठी एखादे बाळ दत्तक घ्यावे हा विचार निश्चितच प्रत्येक दांम्पत्याच्या मनात डोकावित असतो. मात्र दत्तकाचा हा निर्णय घेण्याकरता ह्या अवस्थेत दांम्पत्यांना मानसिक आधाराची तसेच योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. एखादे बालक दत्तक घेणे ही काही साधी बाब नाही.

एखादे बालक दत्तक घ्यायचा आपला विचार असेल तर तदनुषंगित अनेक गोष्टींचा तुम्ही विचार करायला हवा. या बाबतीतील काही प्रश्नांची उत्तरे देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. परंतु त्या खेरीज आणखीही बरेच प्रश्न तुमच्या मनात उभे राहतील. आम्ही आपल्या शंकाचे निरसन करण्यास मदत करु. कायदेशीर सोपस्कार करण्यातही मदत करु.

### दत्तक विधानाबाबत वस्तुस्थिती –

### दत्तक विधान म्हणजे काय ?

आपलं नसलेलं मुल स्वत: चं म्हणुन स्विकारणं.

### बाल कल्याण संस्थेमार्फत दत्तक घेणं का चांगल ?

दत्तक घेणं हा एक भावनिक निर्णय असून त्याला व्यावहारिक आधार द्यायचा असतो. बाल कल्याण संस्थांमधील अनूभवी प्रशिक्षीत कार्यकर्ते तुम्हाला हवा असलेला भावनिक आधार देतील त्याच बरोबर दत्तक घेण्यासाठी कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता मदत करतील.

### दत्तक घ्यावे असे माता–पिता दोघांनाही तीव्रतेने वाटण्याची गरज आहे का ?

होय, कारण मुलांचे संगोपन ही पती–पत्नीची संयुक्त जबाबदारी आहे. दत्तक बालक हे तुमच्या कुटूंबाचाच एक घटक बनत असतो.

### तुम्ही दत्तक घेण्यास केव्हा पात्र ठराल ?

पुढील तिन पैकी एका वर्गवारीत तुम्ही येत असाल तर तुम्हाला दत्तक घेता येईल.

१. ज्यांना मुल होऊ शकत नाही अशी जोडपी.

२. ज्यांना निसर्गदत्त मुलं आहेत अशी जोडपी.

३. स्त्री किंवा पुरुष. (अविवाहीत, विधूर, विधवा, घटस्फोटीत)

### बालक दत्तक घ्यायचे तर त्यासाठी वयाबाबतची काही अट आहे का ?

दत्तकेच्छूक आई व बाळामध्ये ४० वर्षापेक्षा अधिक अंतर नको. दत्तकेच्छूक पालकांच्या वयाची बेरीज ८५ वर्षा पेक्षा अधिक नको.